# ''अपगांचे पुनर्वसन ही एक सामाजिक जबाबदारी''

**प्रा.डॉ. आर.पी. चव्हाण**
एम.फिल., पीएच.डी., नेट, सेट
समाजशास्त्र विभाग,
संत गाडगेबाबा महाविद्यालय, कापशी
मो.नं. ९६५७८४०९४७
ई मेल- rajsoniya114@gmail.com

**प्रस्तावना :**

शारीरिक किंवा मानसिक बिघाडामुळे सर्वसाधारण व्यक्तीप्रमाणे आपली दैनंदिन कामे करणे ज्यांना अशक्यप्राय: आहे, अशा व्यक्तींना 'अपंग व्यक्ती' असे म्हणतात. मुख्यत: अनुवंशिक वारसा, अपघात किंवा रोग या तीन कारणांनी अपंगता निर्माण होऊ शकते. अपंगामध्ये आंधळे, मुके, बहिरे आणि हातापायाने लुळे असलेले किंवा हातपायच नसलेले पांगळे आणि मनाने दुर्बल असणाऱ्या व्यक्ती यांचा समावेश होतो. हृदय, फुफ्फुस, डोळे इ. महत्त्वाच्या अवयवांच्या चिरकारी व्याधीमुळे अकार्यक्षम झालेले स्त्री-पुरूष आणि शैक्षणिक दृष्ट्या कमकुवत असणारी मुले यांचा ही अपंग व्यक्तीत समावेश करण्यात येतो. डॉ. हेन्री कीसलर यांच्या मतानुसार दुष्काळ, रोगराई, युद्ध इ. कारणांमुळे अपंगता प्राप्त झालेल्यांची संख्या जगातील एकंदर लोकसंख्येच्या २५% आहे. हेन्री व्हिकारडो यांनी १९५२ मध्ये अमेरिकेत अंबिलिटीस हंपॉरेटेस नावाची अपंगांच्या पुर्नवसनासाठी एक संस्था काढली. भारतात १९५७ मध्ये श्रीमती फातिमा इस्माईल यांनी मुंबईत एक संस्था स्थापन करून भारतातील अपंगांच्या पुनर्वसनाच्या समस्येस तोंड देण्याच्या प्रयत्नास चालना दिली. जन्मजात अपंग आणि जन्मानंतर झालेले अपंग असे अपंगांचे दोन मुलभूत प्रकार आहेत. अपंगांच्या कार्यक्षमतेनुसार त्यांचे वर्गीकरण करण्यात येते.

लहान वयात अपंगतेचे अस्तित्व ओळखणे अवघड असले तरी महत्त्वाचे असते. अपंगता आहे हे निश्चित झाले की मुलांची शारीरिक मानसिक व भावनात्मक तपासणी करून अपंगतेची व्याप्ती ठरविली जाते व त्यानुसार कोणते उपचार करावे लागतील याचा अंदाज घेता येतो. मुलांच्या सर्वांगीण विकासासाठी त्याला जास्तीत जास्त संधी देणे हे त्याच्या पुनर्वसनाचे उद्दिष्ट असले पाहिजे. पुस्तके, रेडिओ, दुरचित्रवाणी, चित्रपट इ. च्या साहाय्याने अपंग मुलांच्या पालकांना शिक्षण देऊन अपंग मुलांचे संगोपन करावे याविषयी योग्य ती माहिती देण्यात येते.

२००१ च्या जनगणनेनुसार भारतात २.१९ कोटी अपंग व्यक्ती आहेत. म्हणजे एकूण लोकसंख्येच्या २.१३ आहे. त्यामुळे मुके, बहिरे, अंध, मर्यादित हालचाली करू शकणारे आणि मानसिक समस्या असलेले लोक

समाविष्ट आहेत. अशा अपंग व्यक्तीपैकी ७५% लोक ग्रामीण भागात राहतात. ४९% साक्षर आहेत. तर ३४% लोकांकडे रोजगार आहे.

भारतीय राज्यघटनेनुसार सर्व नागरिकांना समता, स्वातंत्र्य, न्याय आणि प्रतिष्ठेचे आश्वासन देण्यात आले आहे व यामध्ये अपंग नागरिकांचाही समावेश आहे. तसेच घटनेनुसार अपंगांच्या सक्षमीकरणाची जबाबदारी राज्य सरकारवर सोपविण्यात आली आहे. घटनेच्या ३५३ व्या कलमातल्या संघराज्य सूचीतील १३ क्रमांकाच्या मुद्यामध्ये अधिनियमित केले आहे, की 'अपंग व्यक्ती (समान संधी, हक्काची सुरक्षा आणि संपूर्ण सहभाग) कायदा १९९५' नुसार अपंगांना समान संधी मिळेल तसेच राष्ट्र उभारणीच्या कार्यात त्यांच्या संपूर्ण सहभाग राहील. अपंगांचे हक्क आणि प्रतिष्ठा जपण्यासाठी व त्यांचा प्रसार करण्यासाठी युएन संयुक्त राष्ट्र संघटनेने ३० मार्च २००७ रोजी केलेल्या ठरावावर भारतोन त्याच दिवशी स्वाक्षरी केली आहे. १ ऑक्टोबर २००८ रोजी भारताने या ठरावास मंजूरी दिली.

**शासकीय योजना :**

**(१) अपंग व्यक्तींना उपकरणे अथवा साहित्य खरेदीसाठी व उभारणीसाठी मदत (ADIP योजना)**

या योजनेचा मुख्य उद्देश आहे, गरजू अपंग व्यक्तींनां आधुनिक टिकाऊ व शास्त्रीय उपकरणे व इतर साहित्य उपलब्ध करून देणे ज्यायोगे त्यांच्या वास्तविक, सामाजिक व मानसिक पुनर्वसनास मदत होईल.

**(२) अपंग व्यक्तींना राष्ट्रीय शिष्यवत्ती देण्याची योजना :**

अपंगाना राष्ट्रीय शिष्यवृत्तीच्या या योजनेनुसार दरवर्षी ५०० नवीन शिष्यवृत्त्या जाहीर करण्यात येतात. मॅट्रीकनंतर एक वर्षापेक्षा जास्त कालावधीचे व्यावसायिक अथवा तांत्रिक अभ्यासक्रम करू इच्छिणाऱ्या अपंगासाठी या शिष्यवृत्त्या आहेत. राज्यसरकार व केंद्रशासित प्रदेशातील व्यवस्थापनास याची विस्तृत प्रसिद्धी करण्यास सांगितले जाते. ४०% अथवा त्यापेक्षा जास्त अपंगता असणारे व ज्यांचे मासिक उत्पन्न १५,००० रू. पेक्षा जास्त नसेल असे विद्यार्थी या शिष्यवृत्तीसाठी पात्र मानले जातात. पदवीपर्यंतचे, पदव्युत्तर, तांत्रिक किंवा व्यावसायिक अभ्यासक्रम शिकणाऱ्यांसाठी दरमहा रू. ७००/- ची शिष्यवृत्ती देण्यात येते. पदविका तसेच प्रमाणपत्र पातळीवरचे व्यावसायिक अभ्यासक्रम करणाऱ्यांना दरमहा रू. ४००/- ची दिली जाते. या शिष्यवृत्तीखेरीज विद्यार्थ्यांना दरवर्षी रू. १०,०००/- पर्यंतची शैक्षणिक फी देखील परत करण्यात येते.

**राष्ट्रीय संस्था/शिखर पातळी संस्था :**

१. दृष्टी अपंगांसाठी राष्ट्रीय संस्था, देहाराडून

२. अस्थिव्यंग अपंगांसाठी राष्ट्रीय संस्था, कोलकाता

३. श्रवण अपंगांसाठी अली यावर जग राष्ट्रीय संस्था, मुंबई

४. मानसिक अपंगांसाठी राष्ट्रीय संस्था, सिकंदराबाद

५. पुनर्वसन प्रशिक्षण व संशोधनासाठी राष्ट्रीय संस्था, कटक

६. शारीरिक अपंगतेसाठी संस्था, नवी दिल्ली

७. बहुअपंग, व्यक्तींच्या सबलीकरणासाठी राष्ट्रीय संस्था, चेन्नई

**अपंग व्यक्तींचे मानवाधिकार त्यासाठी महाराष्ट्र राज्य अपंग कल्याण कृती आराखडा २०११ :**

**(१) अपंगत्वाची व्याख्या :**

'अपंगत्व व अपंग व्यक्ती अथवा अनोख्या समर्थ व्यक्ती म्हणजे अपंग व्यक्ती.'

अपंग व्यक्ती (समान संधी, हक्कांचे संरक्षण आणि संपूर्ण सहभाग) अधिनियम, १९९५ अन्वये अपंग व्यक्तींची महाराष्ट्रातील संख्या

| अ.क्र. | अपंगत्वाचा प्रकार | अपंग व्यक्तींची संख्या | | |
|---|---|---|---|---|
| | | पुरूष | स्त्रिया | एकूण |
| १ | अंध | ३२०४६६ | २६०४६४ | ५८०९३० |
| २ | मुके | ६३८०२ | ४९२४१ | ११३०४३ |
| ३ | बहिरे | ५१७८९ | ४०६०१ | ९२३९० |
| ४ | अस्थिव्यंग | ३७४६७१ | १९५२७४ | ५६९९४५ |
| ५ | मतिमंद | १२३१३९ | ९०१३५ | २१३२७४ |
| एकूण | | ९३३८६७ | ६३५७१५ | १६६९५८२ |

महाराष्ट्र राज्याच्या एकूण लोकसंख्येच्या १.०६% एवढी अपंग व्यक्तींची लोकसंख्या आहे.

**(२) दृष्टीक्षेप :**

अपंग व्यक्तींमधील व्यंग न पाहता अनोखे सामर्थ्य असलेले व्यक्तीमत्त्व असे संबोधून त्यांच्यामध्ये असलेले सामर्थ व क्षमता ओळखून त्या विकसित करण्यासाठी अपंगत्वाचे लवकर निदान त्वरित हस्तक्षेप, व्यावसायिक प्रशिक्षण नोकरी इ. क्षेत्रामध्ये त्यांना संधी देवून आणि कृत्रिम अवयव व साधने उपलब्ध करून दिल्यास त्यांच्यामध्ये जिद्द आत्मविश्वास निर्माण होऊन ते समाजाच्या मुख्य प्रवाहात सामान्य व्यक्तींसारखे सन्मानपूर्वक जीवन व्यतीत करतात ही बाब लक्षात घेऊन शासनाने पुढील दृष्टीकोण (व्हिजन) ठेवला आहे.

प्रतिष्ठा आणि सन्मान अनोख्या समर्थ व्यक्तींसाठी.... त्यांचे सामर्थ्य, कौशल्य आणि जीवनाकडे पाहण्याचा आश्वासक दृष्टीकोन यांना दाद देत त्यांच्या सुप्त सामर्थ्यांचा वापर करून घेत, त्यांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी...

**अपंगांचे शिक्षण :**

अपंगतेमुळे व शाळेच्या वातावरणाशी समरस न झाल्यामुळे मुलांच्या शारीरिक व मानसिक गरजांनुसार शिक्षणाचे वळण बदलावे लागते, काही वेळा मुलांची अपंगता तीव्र असल्यामुळे त्याला शाळेत जाता येत नाही अशावेळी त्यास घरीच शिकवावे लागते. शिक्षकांची श्रेणी, शालेय व्यवस्था आणि शैक्षणिक नियोजन अशा साकल्यात्मक दृष्टीकोनातून अपंगांचे शिक्षण व पुर्नशिक्षण यांचा विचार करावयास हावा, अशी जाणीव निर्माण होऊ लागली आहे. अपंगतेचा प्रकार कोणताही असो शिक्षणाचे तंत्र व साधान कोणतेही असो, अपंगांचे शिक्षण हा एक स्वतंत्र शिक्षण संप्रदाय आहे. जेथे शक्य असेल तेथे वैद्यकीय उपचार शिक्षण व पुनर्वसन यांच्याद्वारा अपंग अवयवांची अथवा इंद्रियांची शक्ती पुन्हा वाढीला लावली पाहिजे. अपंगतेमुळे येणारे वैफल्य, निराशा,

आलस्य यांच्या जखडबंदीतून मुक्तता करण्याचे कार्य शिक्षकाला करावे लागते. अनुभव हा शिक्षक असतोच, तथापित मुलाची अनुभव घेण्याची तयारी आहे, त्यासाठी शिक्षणाचे उपलब्ध करून दिलेली संधी यात मेळ बसावा लागतो. शिक्षक मुलांसाठी अनुभवांचे प्रचंड विश्व उभे करू शकतो. हे विश्व उभे करण्यासाठी वेगवेगळे मनोरंजक, आकर्षक व कल्पक खेळ, शिक्षण साधने नाटक, हस्तकला, वनविहार इ. चा उपयोग शिक्षक करतो या छोट्या छोट्या अनुभवातूनच मुलाच्या मनातील पारतंत्र्य आणि परावलंबन नाहिसे होते आणि मुले स्वतंत्रपणे व आत्मविश्वासाने जीवन जगू शकते.

**अंध-शिक्षण :**

डोळस मुलांचे शिक्षण व अंध मुलांचे शिक्षण यात फारसे भिन्नत्व नाही. परंतु शिक्षणात वापरण्यात येणारी साधने व पद्धती यात स्पष्टपणे भिन्नत्व दिसून येते. अंधांच्या बाबतीत या शिक्षण साधनांचा उपयोग करावा तितका थोडासा असतो. ब्रेल पद्धतीद्वारा अंधांच्या शिक्षणाचे वेगळे तंत्र वाढत आहे. भाषा विषयाच्या अभ्यासात भारतीय ब्रेल शिकणे व लिहिणे हा फार महत्त्वाचा भाग आहे. स्पर्श पद्धतीवर आधारलेल्या या ठिपक्या-ठिपक्यांच्या लिपीतून अंधमुलांना जणू नवीन डोकेच मिळतात. स्पर्श पद्धतीवरच ब्रेललिपी बसविलेली आहे. लुईस ब्रेल या प्रख्यात फ्रेंच समाजसेवकाने ही पद्धत शोधून काढली. युनेस्कोच्या सहाय्याने व बऱ्याच संशोधनानंतर आता सर्वसामान्य अशी भारतीय ब्रेल लिपी तयार झाली आहे. अंध मुलांना संगीत, वाद्यांची दुरूस्ती, टंकलेखन, लघुलेखन, ब्रश करणे, खडू करणे, विणकाम, भरतकाम इ. उद्योगात गुंतविण्याच्या दृष्टीने शिक्षण देण्यात येते.

डोळस मुलाला आपल्या भोवतालच्या अनेक वस्तुंचे अनुभव न कळत येतात. अंध मुलांना त्यांच्या भोवतालच्या जगाशी जास्तीत जास्त परिचय करण्याची संधी आणि नवीन अनुभव मिळण्याची शक्यता उपलब्ध करून दिली पाहिजे. भोवतालच्या समाजाचे प्रतिनिधी म्हणून डोळस शिक्षकांना भोवतालच्या समाजाचे प्रतिनिधी म्हणून डोळस शिक्षकांना भोवतालच्या जगातील विचार, अनुभव, भावना अंध मुलांच्यापर्यंत पोचव्याव्या लागतात. अंधांना ज्ञानेंद्रियाद्वारा मिळणारे शिक्षण मर्यादित असल्यामुळे मनात निर्माण होणारी प्रतिके सोडली तर संज्ञाग्रहण, संकल्पनीकरण, सामान्यीकरण, सारग्रहण, अमुर्तीकरण आणि प्रकटीकरण याबाबतीत अंध आणि डोळस मुले यात फारसा फरक आढळून येत नाही.

**फणसा येथील प्रयोग :**

एका नव्या प्रयोगाची इथेच दखल घेणे वाजवी ठरेल. अंधांच्या राष्ट्रीय संस्थेने टाटा निधीच्या मदतीने अंधांचे शेतकी आणि ग्रामीण टाटा शिक्षण केंद्र स्थापन केलेले आहे. मुंबईपासून १०० कि.मी. वर उंबरगाव तालुक्यात फणसा या गावी ९७.१२५% हेक्टर जमीन घेऊन हे केंद्र सुरू केले आहे. सर्व देशभराच्या अंध मुलांना येथे प्रवेश मिळतो. शेती, कुक्कुटपालन, दुग्धव्यवसाय, बागकाम वगैरे व्यवसाय अंधांना शिकवून त्यांना ग्रामीण विभागातच स्थायिक करावयाचे हा त्या केंद्राचा हेतू आहे.

**वाचेची अपंगता :**

वाचा शक्तीचा विकास न होण्यास बहिरेपणा, मानसिक विकृती, भावनिक विकार, शारीरिक विकृती आणि प्रमस्तिष्क व निमस्तिष्क यांचे विकार ही प्रमुख कारणे आहेत. या व्यक्तींना सहानुभूतीची फार गरज असते. बोलताना अडखणे, तोतरे बोलणे, एखादाच शब्द बोलता न येणे व पूर्णपणे मुके असणे असे या अपंगतेचे

निरनिराळे प्रकार असतात. अशा व्यक्तींना उभे करून ओठांच्या हालचाली करणे, जीभ, तालु, ओठ यांच्या हालचालींनी शब्दोच्चार शिकविणे हे शिक्षणाचे महत्त्वाचे अंग आहे.

**बहिरेपणा :**

जन्मजात बहिरेपणा बोलता येऊ लागल्यावर आलेला बहिरेपणा, रोगांमुळे उद्भवलेला बहिरेपणा व मर्यादित बहिरेपणा असे बहिरेपणाचे वर्गीकरण करतात. १६ व्या शतकात जेरॉनीमो कार्डानो याने बहिऱ्यांना शिकवणे शक्य असते असे प्रथम दाखवून दिले. १८ व्या शतकात शार्ल मीशेल दे ल एपे (१७१२-१७८९) यांनी खुणांच्या भाषेचा शोध लावला. झामूएल, हायनिके (१७२७-१७९०) यांनी ओष्ठ वाचनाचा शोध लावला. श्रवण शक्तीच्या जन्मजात कमतरतेमुळे जर बहिऱ्या व्यक्तीला जर बोलता येत नसेल तर त्या व्यक्तीस मुक बहिरा असे म्हणतात. कानामागील जन्मजात विकृती, व्हायरस/संसर्ग व मध्यकर्णातील जंतू संसर्ग या कारणामुळे वयाच्या ४५ व्या वर्षात बहिरेपणा येऊ शकतो. ५ वर्षानंतर जंतू संसर्ग, गोवर या कारणांनी बहिरेपणा उद्भवतो. बहिऱ्या व्यक्तीच्या पुनर्वसनात ओष्ठवाचन व श्रवण साहाय्यक यांचे महत्त्वाचे अंग असते. अशा व्यक्तींना ओष्ठ वाचन व श्रवणानुसारी चिन्हे, रंगांचे संकेत व आकृत्या यांच्या सहाय्याने शिक्षण देण्यात येते.

**मुक-बहिऱ्या मुलांचे शिक्षण :**

मुक बहिऱ्या मुलांचे प्रश्न मुख्यत: श्रवण हानीत व वाचाहिनता यांच्यातून निर्माण झालेले असतात. मुक बहिऱ्या मुलांना समोर एखादी वस्तू दिसत असते, परंतु त्या वस्तुला काय म्हणावयाचे तिचे वर्णन कसे करावयाचे याचे आणि तिच्यासंबंधी ज्ञान कसे प्राप्त करावयाचे हा त्यांच्यासमोरील अवघड प्रश्न असतो. मुक बहिऱ्या मुलांच्या मानसिक प्रतिक्रिया होत असाव्यात. परंतु त्यांना शब्दांचा आकार देता येत नसावा. बहिरेपणामुळे वाचा जाणे हीच मुक बहिऱ्या मुलांच्या बाबतीत येणारी सर्वात मोठी अपंगता नव्हे, त्याहून मोठी अपंगता त्यांच्या शिक्षणात आणि जीवनात निर्माण होत असते.

**शारीरिक अपंगांचे शिक्षण :**

अपंग माणसाच्या शिक्षणाला हेतू अपंगतेपासून मुक्तता हा आहे. परंतु पुष्कळदा अपंगाची शारीरिक स्थिती अशी विचित्र असते, की दुसऱ्या व्यक्तीची किंवा यांत्रिक साधनांची मदत अपरिहाय ठरते. टेकण्यासाठी लागणारी काठी किंवा कुबड्या, चष्मा, दातांची कवळी अशी कृत्रिम साधनांची रोजच्या व्यवहारातील उदाहरणे आहेत. मुलांची भावनिक व सामाजिक वाढ पूर्ण होण्यासाठी या मुलांना खेळण्याची संधी मिळावयास हवी. खेळ हे मुलांच्या व्यक्तीमत्त्व प्रकटीकरणाचे अत्यंत स्वाभाविक असे माध्यम आहे. परंतु अपंग मुलांना पुष्कळदा मर्यादित चौकटीत सुद्धा भरपूर खेळण्याची संधी मिळत नाही. त्यामुळे त्यांच्या क्रीडा प्रवृत्तीचा व व्यक्तीमत्त्वाचा विकास होत नाही. सुप्रसिद्ध मानसशास्त्रज्ञ डॉ. मॅलिनी क्लाईन यांनी म्हटल्याप्रमाणे खेळ हा मुलांच्या मनाच्या विकासावर प्रकाश टाकणारा मोठा झरोका आहे.

**पुनर्वसन :**

शारीरिक अपंग मुलांना शिक्षण देण्याच्या पुढील पद्धती सर्वत्र वापरल्या जातात.

१. नेहमीच्या वर्गात शिकविणे तर आवश्यक ती साधने देणे.

२. नेहमीच्या शाळेत पण वेगळ्या वर्गात शिकविणे गरज भासेल व शक्य असेल त्यावेळी सर्वांबरोबर एकत्र आणणे.

३. शारीरिक अपंगांसाठीच त्यावेळी काढलेल्या केवळ दिवसा भरणाऱ्या वेगळ्या शाळांत शिकविणे.

४. शारीरिक अपंग मुलांसाठीच असलेल्या व राहण्याची सक्ती असणाऱ्या विशेष शाळांत शिकविणे.

५. अपंगांच्या इतर गटांसाठी काढलेल्या इतर शाळात पण वेगळ्या गटात शिकविणे.

६. रूग्णालयातील वर्ग

७. पत्रव्यवहार शिक्षण

८. रेडिओ/टेलिव्हीजन यांच्याद्वारा शिकविणे आणि

९. खाजगी शिक्षक नेमणूक करून शिक्षणाची व्यवस्था करणे.

**सारांश :**

मुल ज्या कुटूंबातील आहे त्या कुटूंबातील व्यक्तींची मनोभूमिका व आर्थिक स्थैर्य लक्षात घेणे ही आवश्यक आहे. मुलाला व त्याच्या कुटुंबियांना वास्तव दृष्टीने वागणूक देणे महत्त्वाचे आहे. सर्वसाधारण शिक्षण पद्धती व खास शिक्षण पद्धती यांचा वापर करून मुलांची अपंगता जास्तीत जास्त दूर करून त्यास स्वावलंबन साध्य झाले तरच पुनर्वसनाचा मुलभूत हेतू साध्य होऊ शकतो. अंध, मुक, बहिरेपणा, शारीरिक अपंगत्व व्यक्तींचे वैद्यकीय दृष्टीने पुनर्वसन करण्याचा विचार केला जात आहे. सामाजिक न्याय व सशक्तीकरण मंत्रालयामधील अपंगत्व विभाग अशा व्यक्तींना सबल व सक्षम करण्याचे काम करत आहे.

-●●●●●-

**संदर्भ :**

१. http://www.disabilityindia.com/आणि सामाजिक न्याय मंत्रालय

२. Fergusson Thomas, Kerr A.W., *Handicapped Youth, London, 1960*

३. गोखले शरदचंद्र, *नावडती मुले, पुणे १९६३, ३ मोहनी, उषा, अपंगत्वावर विजय, पुणे, १९६१*

४. भारताची जनगणना २००१

५. नॅशनल सँपल सर्वे ऑर्गनायझेशन २००२

६. www.indg.in/social

७. www.maha-socialjustice.jov.in

८. www.marathivishwakosh.in